# प्रकरण – 15

## हॉस्पीटलच्या काम करण्याच्या पध्दती

बाहय रुग्ण विभागात आलेल्या रुग्णांची संबंधित विभागातील डॉक्टरांकडून तपासणी केली जाते.

कर्तव्यपर असलेल्या डॉक्टरांकडून अपघात विभागात आलेल्या रुग्णांची त्वरीत तपासणी केली जाते व त्वरीत औषधोपचार केले जातात.

सर्व आंतर (दाखल) रुग्णांना सकाळी 10 वाजेपर्यंत तपासले जाते आणि आवश्यक असेल तेव्हा तपासले जाते.

पॅथॉलॉजी चाचण्या त्याच दिवशी सदर रुग्ण बाहय रुग्ण विभागात आल्यानंतर किंवा दुसरे दिवशी सकाळी केल्या जातात.

गंभीर रुग्णांचा एक्स-रे आणि इसिजी त्वरीत त्याच दिवशी केले जातात आणि इतर रुग्णाचे दुसरे दिवशी सकाळी केले जातात.

सुचीवर असलेली औषधे प्रत्यि दिवशी रुग्णांना उपलब्ध करुन दिली जातात. तसेच सुचीवर नसलेली पण आवश्यक असलेली औषधे रुग्णांना उपलब्ध करुन देण्यात येतात.

हॉस्पीटल अधिका-यांकडे आलेल्या तक्रारींची गांर्भीर्याने दखल घेतली जाते. नर्सिंग कर्मचा-यांकडून शक्य तेवढी उत्तम सेवा रुग्णांना दिली जाते.

सर्व हॉस्पीटल कर्मचारी सहानुभूतीपूर्वक व नम्र वागण्याचा प्रयत्न करतात. गरीब धर्मादाय निधीचा वापर गरीब आणि गरजू रुग्णांसाठी केला जातो.